साप्ताहिक कमलाभवानी

# संदेश

वर्ष 34 वे

करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...

संस्थापक संपादक
डॉ.अॅड.बाबूराव हिरडे

संपादक
सौ.उषादेवी बाबूराव हिरडे

वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०

www.saptahiksandesh.com

रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३४ वे | अंक क्र.१० | पाने-१२ | दि.१५/३/२०२४ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत ४ रू.

आपल्या व्यवसायाची ऑनलाईन जाहिरात करण्यासाठी उपयुक्त ठिकाण
साप्ताहिक संदेश ऑनलाईन न्यूज पोर्टल
9822058106

मजबुती आणि विश्वास एकाच ठिकाणी...!
प्रोप्रा.अमोल ढवळे मो.९८५०१२५५६१
शिवम बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
आयकॉन स्टील व सिमेंटचे अधिकृत विक्रेते
PARAS Group of Industries
आमच्याकडे नामांकित कंपनीचे स्टील, सिमेंट, सनला, पत्रे, चैनल, पाईप, क्रशसॅन्ड व खडी तसेच बांधकामासाठी लागणारे मटेरीयल होलसेल दरात मिळेल.
पत्ता : बायपास रोड, निलज चौक, संत निरंकारी मंडळ शेजारी, करमाळा

## माढा लोकसभेसाठी धैर्यशील मोहिते-पाटील यांनी निवडणूक लढवावी - मोहिते-पाटील समर्थकांची इच्छा

करमाळा : माढा लोकसभा मतदार संघात भाजपाने उमेदवारी जाहीर केली असून पुन्हा विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांना उमेदवारी दिली आहे. ही उमेदवारी जाहीर झाल्यानंतर भाजपाच्या कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला आहे. तर तालुक्यातील मोहिते-पाटील समर्थक अस्वस्थ झाले आहे. मोहिते-पाटील समर्थकांनी मोहिते-पाटील गटाचे नेते धैर्यशील मोहिते-पाटील यांनी राष्ट्रवादीची तुतारी घेऊन ही निवडणूक लढवावी; अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

भाजपाने राज्यातील २० मतदार संघातील उमेदवार जाहीर केले. त्यात माढा मतदार संघातील उमेदवार जाहीर झाल्यानंतर अकलूज येथे स्थानिक कार्यकर्त्यासह जिल्ह्यातील अनेक मोहिते-पाटील समर्थकांनी अकलूजला जावून नेत्यांची भेट घेतली आहे. त्यामध्ये सर्वांनीच यावेळी शांत न बसता, आपण राष्ट्रवादीमध्ये जावून ही निवडणूक लढवावी; अशी मागणी केली आहे. मागील निवडणुकीत माळशिरस तालुक्यातून जवळपास १ लाख १३ हजाराचे मताधिक्य देवून नाईकनिंबाळकरांना निवडून आणले होते. त्यानंतर खा.निंबाळकरांनी मोहिते-पाटील यांच्यासोबत राहण्याची गरज असताना त्यांनी मोहिते-पाटील यांना डावलत इतरांना बळ देण्याचे काम






केले. त्यामुळे मोहिते-पाटील गट त्यांच्यावर नाराज होता. त्यानंतर या गटाकडून धैर्यशील मोहिते-पाटील यांना उमेदवारी मिळावी; अशी मागणी केली होती, पण भाजपा श्रेष्ठीने ती मागणी धुडकावून पुन्हा विद्यमान खासदारांना उमेदवारी दिल्याने मोहिते-पाटील समर्थक चिडले आहेत. करमाळा तालुक्यातील मोहिते-पाटील समर्थक व माजी जिल्हा परिषद सदस्या सवितादेवी राजेभोसले, शहाजीराव देशमुख, महेंद्र पाटील, बंडू माने, हरीभाऊ मंगवडे, अमरजित साळुंके, अॅड.अमोल घाडगे आदींनी या निवडणुकीत मोहिते-पाटील यांनी माघार न घेता निवडणूक लढवावी असे आवाहन केले आहे.

करमाळा तालुक्यात सध्यातरी भाजपा उमेदवार खा.रणजितसिंह नाईकनिंबाळकर यांना फारसा विरोध दिसून येत नाही. भाजपाची स्थिती तालुक्यात मजबूत आहे. राष्ट्रवादीचे समर्थक (अजित पवार गट) विद्यमान आमदार संजयमामा शिंदे भाजपा उमेदवारासोबत आहेत. माजी आमदार जयवंतराव जगताप, त्यांचे चिरंजीव शंभुराजे जगताप हे भाजपामध्येच आहेत. बागल गटाने भाजपामध्ये प्रवेश केला आहे. शिवसेना शिंदे गटाचे माजी आमदार नारायण पाटील व त्यांचे समर्थक तसेच जिल्हाध्यक्ष महेश चिवटे व अन्य शिवसेनेचे नेते त्यांच्याबरोबर असल्याने सध्यातरी भाजपा उमेदवाराचे पारडे जड दिसत आहे.

प्रवेश... श्री गिरधरदास देवी प्रतिष्ठान संचलित प्रवेश..
नवभारत इंग्लिश मेडियम स्कूल & ट्विंक्लिंग स्टार्स
पुणे रोड, करमाळा., जि.सोलापूर
ज्ञानम् परम् बलम्
मोफत.. मोफत.. अॅडमिशन !



Nursery, L.K.G., U.K.G. 1st to 10th
वर्गासाठी प्रवेश देणे चालू



एल.के.जी. आणि यु.के.जी ची फी भरून
नर्सरीची फी माफ होणार
ऑफर : दि.१/५/२०२४ पर्यंत

टीप : नवभारत इंग्लीश स्कुल आणि वेताळपेठ या दोन्हीकडे नर्सरी ते दहावीचे प्रवेश सुरू !

प्रशालेची वैशिष्ट्ये...
- पहिली ISO नामांकीत School
- RO Water Machine असणारी School
- शहरातील वायु प्रदुषण, ध्वनी प्रदुषण इ. पासून मुक्त वातावरण
- स्वत:ची प्रशस्त इमारत
- प्रशस्त Play Ground
- शिशु वर्गासाठी सुसज्ज खेळणीगृह प्रशस्त क्रिडांगण
- तज्ञ व अनुभवी शिक्षकवृंद
- उत्कृष्ट मार्गदर्शन व वैयक्तीक लक्ष
- 10th Exam साठी करमाळा Center
- विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज Computer, Science Lab, Library
- प्रशालेमध्ये रोजच्या रोज आरोग्यवर्धक स्वच्छता
- मुलांसाठी खेळण्यास बगीचा
- प्रत्येक Class मध्ये T.V. (Digital Classes)
- Olympiad, MTS, Scholarship मध्ये International Level वर पोहोचलेला विद्यार्थी वर्ग

खालील QR Code ला Scan करून School पाहू शकता.

Hurry up Admission open



Mob No.7741907285, 9960522370

राजकारणाचा खेळ हा उघड्या डोळ्याने पाहता येत नाही तो मुक्या मनाने समजून घ्यायचा असतो....!

## संपादकीय..............................................!

# माढ्याचा तिढा..!

माढा लोकसभा मतदार संघाची निर्मिती सन २००८ साली झाली. माढा, करमाळा, माळशिरस, सांगोला व सातारा जिल्ह्यातील फलटण व माण या सहा तालुक्यांचा मतदार संघ आहे. मतदार संघाची निर्मिती झाली व त्याचा आरंभ राष्ट्रवादीचे संस्थापक व माजी केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांच्या विजयाने झाला होता. या निवडणुकीत शरद पवार यांच्या विरूध्द भाजपाचे सुभाषबापू देशमुख उभे होते, तसेच रासपाचे महादेव जानकर हे ही उभे होते. त्यावेळी पवार यांना ५,३०, ५९६ मते मिळाली तर देशमुख यांना २,१६,१३७ तर जानकर यांना ९८९४६ मते मिळाली. त्यावेळी पवार हे तब्बल ३,१४,४५९ मताच्या फरकांनी विजयी झाले होते. त्यानंतर सन २०१४ च्या निवडणुकीत पवारांचे वारसदार कोण..? हा प्रश्न निर्माण झाला होता. अखेर तत्कालीन राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांना उमेदवारी मिळाली होती. त्यावेळी मोहिते-पाटील यांनी आपले पुत्र रणजितसिंह मोहिते-पाटील यांना उमेदवारी द्या; अशी मागणी केली पण श्रेष्ठीने ते मान्य केले नाही. सन २०१४ च्या निवडणुकीत मोहिते-पाटील यांच्या विरूध्द महायुतीचे उमेदवार स्वाभीमानी शेतकरी संघटनेचे नेते सदुभाऊ खोत तसेच कै.प्रतापसिंह मोहिते-पाटील हे ही उभे होते. यावेळी मोहिते-पाटील अवघ्या २५,३४४ मतांनी विजयी झाले. त्यावेळी त्यांना ४,८९,९८९ मते मिळाली तर खोत यांना ४,६४,६४५ मते मिळाली तर प्रतापसिंह यांना २५१८७ मते मिळाली होती. थोडक्यात मोदी लाटेत मोहिते-पाटील हे निसटत्या मतांनी विजयी झाले होते. त्यानंतर सन २०१९ च्या निवडणूकीत भाजपाने स्वत:चा उमेदवार उभा केला. यावेळी त्यांनी महाविकास आघाडीला दणका देण्यासाठी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष रणजितसिंह नाईकनिंबाळकर यांना उमेनवारी दिली. त्यावेळी राष्ट्रवादीकडून संजयमामा शिंदे यांना उभे केले होते. त्यावेळी मोदी लाटेचा फायदा नाईकनिंबाळकर यांना मिळाला. ते ८५७६४ मतांनी विजयी झाले. नाईकनिंबाळकर यांना ५,८६,३१४ ता शिंदे यांना ५,००,५५० मते मिळाली. यावेळी पुन्हा भाजपाने विद्यमान खासदार नाईकनिंबाळकर यांना उमेदवारी जाहीर केली आहे.

खा.नाईकनिंबाळकर व मोहिते-पाटील परिवारात गेल्या अनेक दिवसापासून मतभेद असल्याचे दिसत आहे. त्या पार्श्वभुमीवर यावेळी नाईकनिंबाळकर यांच्या ऐवजी धैर्यशिल मोहिते-पाटील यांना भाजपाने उमेदवारी द्यावी यासाठी मोहिते-पाटील परिवाराने खुप प्रयत्न केले होते पण त्यात यश आले नाही. त्यामुळे पक्षांतर करून थोडक्यात राष्ट्रवादीच्या तुतारीवर निवडणूक लढवावी यासाठी मोहिते समर्थक प्रयत्नशील आहेत. तसंतर सोलापूर जिल्हा हा मोहिते-पाटील यांचा बालेकिल्ला होता. मोहित-पाटील बोले व जिल्हा डोले असे पुर्वी चित्र होते. याला काही प्रमाणात अक्कलकोट, दक्षिण व उत्तर सोलापूर आणि शहराचा काही अपवाद होता. पुर्वी जिल्ह्यातील राजकारणाचा निर्णय अगोदर अकलूजला व्हायचा मग जिल्ह्यात जाहीर व्हायचा. अकलूजकरांनी सांगितलेला शब्द अंतीम होता. ते म्हणतील तोच नेता, तोच उमेदवार, तोच कारखान्याचा चेअरमन, तोच दुध संघाचा संचालक, /चेअरमन, जिल्हा बँकेचा संचालक/चेअरमन, जिल्हा परिषदेचा सदस्य/अध्यक्ष, एवढेच नाहीतर तालुक्यातील पंचायत समितीचा सभापती व उपसभापतीची चिठ्ठी अकलूजवरून येत असे. हे सुत्र सुर्रास सुरू होते. त्यामुळे कुवत नसलेली पण निष्ठा असलेली माणसं तर काही चमचेगिरी करणारी माणसं पुढे आली. संत तुकाराम महाराज म्हणतात तसे 'थोरायरच्या श्वानालाही सन्मान' तसे झाले होते. त्यांच्याकडच्या सेवकांनेही आमदार-सभापतीला झापावे व इतरांनी ऐकावे असे चित्र झाले होते. या परिवारातील २० वर्षाच्या मुलाच्या पायावर ५० वर्षाच्या पुढाऱ्याने जनमाणसात डोके ठेवावे; अशी अनिष्ठ प्रथा सुरू झाली होती. या व अन्य सर्वच बाबीचा अतिरेक झाला होता. याबाबीला करमाळेकरांनी पहिला सुरूंग लावला. आदिनाथच्या निवडणूकीत कै.प्रतापसिंह मोहित-पाटील यांनी कडक भुमीका घेतली. त्यांनी बागल गटाला शह देण्यासाठी जगताप गट, नारायण पाटील गट यांच्याबरोबर युती करून स्वत:च्या नेतृत्वाखाली आदिनाथची निवडणूक लढवली. सर्वशक्ती पणाला लावली, अकलूज व जिल्ह्यातील मोहिते-पाटील गटाचे कार्यकर्ते, पाहुणे-रावळे प्रचाराला बोलावले होते पण करमाळा तालुक्यातील स्वाभिमानी जनतेने मोहिते-पाटील यांना आस्मान दाखवले. त्यावेळी मोहिते-पाटील यांचे भरकटलेले विमान जमीनीवर आले. त्यानंतर मोहिते-पाटील गटाचे जिल्ह्यातील प्रस्थ कमी होऊ लागले. सन २००९ च्या विधानसभा निवडणुकीत राज्याचे माजी उपमुख्यमंत्री म्हणून असलेले दादा गटातटाच्या राजकारणाचे बळी ठरले आणि पंढरपूर विधानसभा मतदार संघातून भारत भालके यांच्याकडून पराभूत झाले. त्यानंतर जिल्ह्यातील सर्वच तालुके मोहिते-पाटील यांच्या दबावातुन मुक्त झाले.

दरम्यान माढा, बार्शी, मोहोळ या मंडळींनी आपापल्या तालुक्यात पाणी आणले, साखर कारखाने उभारले, स्थानिक प्रगती करून तालुक्यात स्वत:चे वेगळे स्थान निर्माण केले. त्यामुळे मोहिते-पाटील यांचे जिल्हा दुध संघ, जिल्हा परिषद, जिल्हा बँक या संस्थावरील बऱ्यापैकी वर्चस्व कमी झाले. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वरीष्ठ नेत्यांनीही मोहिते-पाटील यांचेकडे दुर्लक्ष केले म्हणण्यापेक्षा त्यांची मोनोपॉली संपवण्यासाठी प्रयत्न केले. अन्य नेत्यांना पुढे येण्यासाठी सर्वार्थाने मदत केली. त्यामुळे ज्या घरात एकाचवेळी मंत्री, खासदार, आमदार, सभापती, जिल्हा परिषदेतील महत्वाची पदे होती, अशा घरात एकही मानाचे पद नव्हते. असे असुनही त्यांना वरीष्ठाकडून हात मिळत नव्हता. त्यामुळे एक वेळ तर अशी आली होती, की आता मोहिते-पाटील पक्ष बदलणार असे बोलले जात होते. मोहिते-पाटील समर्थक खुपच अस्वस्थ होते पण तसे काही झाले नाही. त्यानंतर उशीरानेच विजयदादांना पक्षाने विधानपरिषदेत घेतले. या सर्व कठीण प्रसंगातही विजयदादा अत्यंत सयंमशीलपणे वागले. एवढ्या घडामोडी होत असताना त्यांनी थोडीही तिखट प्रतिक्रिया व्यक्त केली नाही. मुळातच दादांचा स्वभाव शांत व संयमी आहे. दादांची सुरवात जिल्हा परिषदेचे अध्यक्ष म्हणून झाली, त्यानंतर आमदार, उपमंत्री व त्यानंतर मंत्री म्हणून ते कार्यरत होते. उपमंत्र्यापासून ते उपमुख्यंमंत्र्यापर्यंत त्यांचा प्रवास झाला. या प्रवासात त्यांच्या वागण्यातील, बोलण्यातील मृदुता कधीही कमी झाली नाही. मोठी माणसं खरंच कशी मोठी असतात हे दादाकडूनच समजते. अशा दादांना निकटवर्तीयांच्या चुकीच्या वागण्याचा फटका बसला आणि पंढरपूर मतदार संघात हार पत्कारावी लागली. माजी मुख्यमंत्री कै.विलासराव देशमुख यांच्यासारखे त्यांचे झाले होते. पण कै.देशमुख यांनी धीर सोडला नव्हता, ते जोमाने काम करत होते, नंतरच्या निवडणुकीत ते निवडून तर आलेच पण राज्याचे मुख्यमंत्री झाले. दादांच्या दृष्टीने तर वेगळीबाब आहे, कारण दादा हे बाहेरच्या मतदारसंघात जावून पराभूत झाले . दादांच्या आजपर्यंतच्या प्रवासात त्यांनी जोडलेली अनेक माणसं आहेत. पवार परिवाराकडून होत असलेली हेळसांड पाहून आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी भाजपामध्ये प्रवेश केला. त्यानंतर भाजपाने त्यांना विधानपरिषदेवर घेतले. मोहिते-पाटील गटाला भाजपाने एवढेच पद दिले जे समर्थन अपेक्षीत होते तसे समर्थन मिळाले नाही. या निवडणुकीत भाजपाकडून उमेदवारी त्यांना पाहिजे होती पण ती मिळाली नाही.

माढा लोकसभा मतदार संघाची निर्मिती झाली आणि सुरवातही शरद पवार यांच्या सारख्या दिग्गज माणसाच्या प्रतिनिधीत्वाने झाली ही विशेष बाब होती. श्री.पवार यांनी बारामतीला कॅलीफोर्निया बनवले आहे. शेती, औद्योगिकरण, शिक्षण, समाजकारण सर्व क्षेत्रात चौफेर प्रगती केली आहे. त्यामुळे हे नेतृत्व माढा मतदार संघात नक्कीच क्रांती करेल अशी अपेक्षा येथील मतदारांना होती. तसे आश्वासन प्रचार सभेत बहुतेकांनी दिलेले होते. दुर्दैवाने ना.पवार हे केंद्राच्या राजकारणात व कृषीमंत्री म्हणून पाच वर्ष व्यस्त होते. रूपयाचे मुल्य घटत असताना, मंदीच्या काळातही त्यांनी कृषी खाते पुढे आणले. शेती उत्पादन वाढले, निर्यात वाढली, साखर कारखानदारीला बळ दिले. केंद्रीय मंत्रीमंडळात सर्वात मोठे काम कृषीखात्याचे ठरले पण त्यांनी माढा मतदार संघासाठी पाहिजे तसा प्रयत्न केला नाही किंवा तसा त्यांना वेळा मिळाला नाही. थोडाफार प्रयत्न केला पण तो नाममात्र. नागरिकांच्या अपेक्षा मोठ्या व प्रयत्न जुजबी, कोणाचेच समाधान झाले नाही. एकही मोठा उद्योग उभा राहिला नाही, रेंगाळलेले प्रकल्प परिपुर्ण झाले नाहीत, विकासाला चालना मिळाली नाही. वीज, पाणी, रस्ते हे मुलभुत प्रश्नही सुटले नाहीत. ना.पवार यांना जमले नसेल पण त्यांचे प्रतिनिधी म्हणून कोणीतरी येथील विकास करण्यासाठी पुढाकार घ्यायला पाहिजे; तसा कोणी घेतला नाही. राज्य सरकार त्यांचे असुनही राज्यशासनाने पवार साहेबाचा मतदार संघ म्हणून विशेष लक्ष दिले नाही. त्यामुळे येथील मतदार नाराज होता. त्यानंतरही मोहिते-पाटील यांना या मतदारसंघातून संधी मिळाली होती पण त्यांच्याही काळात माढा लोकसभा मतदार संघात विकासाचे वारे वाहिले नाही. त्यामुळे मतदारांनी भाकरी फिरवली व भाजपाला संधी दिली.

विद्यमान खासदार यांनी शेवटच्या टप्प्यात मतदारसंघाकडे लक्ष दिले पण ठोस कामांची मोठी यादी नाही. त्यामुळे मतदारसंघात त्यांचे स्वागत थंडेच आहेत पण सध्या भाजपातील इनकमींग व राज्य सरकार मधील पदाधिकाऱ्यांचे असलेले पाठबळ . यामुळे वर वर तर नाईक निंबाळकरांना करमाळा तालुक्यातून विरोध दिसत नाही. पण मतदारांच्या मनात नेमके काय हे नंतर कळणार आहे. त्यामुळे यावेळी पुन्हा एकदा मोहिते-पाटील परिवारांनी रणांगणात उडी घ्यावी;असे मोहिते-पाटील समर्थकांची अपेक्षा आहे. सध्यातरी जर तर चे गणीत आहे. समर्थकांची अपेक्षा आहे पण मोहिते-पाटील भाजपाच्या विरूध्द जाण्याचे धाडस करतील का ? हा महत्वाचा प्रश्न आहे. काही आश्वासनावर ते गप्प बसलेतर समर्थक बिच्चारे काय करणार..? एकंदरीत यावेळी विरोधकाकडून धर्यशील मोहिते-पाटील, रासपाचे महादेव जानकर, अभयसिंह जगताप, संजीवराजे नाईकनिंबाळकर (बाबा) की आणखी कोण हे कोडे लवकरच सुटेल व माढ्याचा तिढा त्यावेळी सुटेल !

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# महिलेचा सन्मान करणे ही खरी ईश्वर पुजा : संतोष कुलकर्णी




करमाळा(सं.प्र.): स्त्री ही अबला नसून सबला आहे. अखिल विश्वाची जननी आहे. संसारीक जीवनामध्ये माता, भगिणी, पत्नी, मैत्रीण अशा विविध रूपामधील भुमिका बजावणाऱ्या महिलेचा सन्मान करणे ही खरी ईश्वर पुजा आहे; असे प्रतिपादन अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था नाशिकचे करमाळा तालुका अध्यक्ष संतोष कुलकर्णी यांनी केले.

महिला दिनानिमित्त ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेच्या वतीने आयोजित करमाळा तालुक्यातील होतकरू, धडाडीने काम करणाऱ्या महिला व उद्योजक महिलांच्या सत्कार समारंभ कार्यक्रमात श्री.कुलकर्णी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा ग्राहक मंच महिला आघाडीच्या अध्यक्षा माधुरी परदेशी या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून गिरधरदास देवी विद्यालयाच्या माजी मुख्याध्यापिका निलीमा पुंडे उपस्थित होत्या.

यावेळी मंजिरी जोशी, सारीका पुराणिक, किसन कांबळे, संजय राजेघोरपडे यांनी कवितेचे वाचन केले. तसेच उपस्थित सर्व महिलांनी आपण करत असलेल्या व्यवसायाचे व तो व्यवसाय कसा उभा केला या संबंधीची माहिती आपल्या भाषणातून सांगितली. यामध्ये निशिगंधा शेंडे व रेखा परदेशी यांनी आपण करत असलेल्या कामाची रूपरेषा सांगितली. माधुरी परदेशी यांनी आपले अनुभव सर्वांसमोर सांगितले. निलीमा पुंडे यांनी शैक्षणिक कार्यातील अनुभव कथन केला. वंदना पाटील व ललिता वांगडे यांनी अशाप्रकारचा सत्कार प्रथमच होतो आहे; अशी भावना व्यक्त केली. यावेळी माधुरी भणगे, पुजा मसलेकर, ज्योती कुलकर्णी, वैष्णवी कुलकर्णी यांचेसह महिला उपस्थित होत्या. सुत्रसंचालन संजय घोरपडे यांनी केले तर आभार वनमाला बाहुलीकर यांनी मानले.

विघ्नहर्ता इंटिरीयर
प्रोप्रा : अभिषेक कमलेश देवी
मो.9028075051
करमाळा शहरातील एकमेव 'लॅमिनेट आणि हार्डवेअर' चे भव्य शोरूम
देवी प्लायवुड अँड हार्डवेअर
• प्लायवुड • किचनट्रॉली • वॉलपेपर
• हार्डवेअर • फेव्हिकॉल • वुडन फ्लोरिंग • सनमायका
प्रोप्रा : अभिनव कमलेश देवी 9011524252
पत्ता : मेनरोड, जैन मंदिर जवळ, करमाळा., जि.सोलापूर

# इंग्रजी माध्यम संस्था चालकांची संघटनेच्या अध्यक्ष पदी प्राचार्य जयप्रकाश बिले



करमाळा(सं.प्र.) : करमाळा तालुका स्वयंअर्थ इंग्रजी माध्यम संस्था चालकांची संघटनेच्या अध्यक्ष पदी प्राचार्य जयप्रकाश बिले यांची निवड करण्यात आली आहे.

झरे येथे तालुक्यातील इंग्रजी माध्यम शाळा संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. यावेळी करमाळा तालुका स्वयंअर्थ इंग्रजी माध्यम संस्था चालकांची संघटना नुकतीच स्थापन करण्यात आली असून, त्यावेळी सर्वानुमते अध्यक्ष पदी बिले यांची निवड करण्यात आली. तसेच सचिव पदी जयंत दळवी, विश्वस्त म्हणून नितीन भेगे, संदिपान गुटाळ, आबा साळुंखे, डॉ.ब्रिजेश बारकुंड, तानाजी करचे यांची निवड करण्यात आली. या बैठकीत सन २२-२३ अखेर पर्यंत २५ टक्के आरटीई ची फी विद्यार्थ्यांची शासनाकडून दिली जात होती, ती २०२४-२५ पासून शासनाने देण्याविषयी नकारात्मक दर्शवली असल्याने इंग्रजी माध्यमांच्या शाळा चालवणे कठीण जाणार आहे. तसेच अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व महाविद्यालयास खासदार, आमदार यांचेकडून विकासकामासाठी निधी दिला जातो तो इंग्रजी माध्यमाच्या शाळांना मिळावा. शिष्यवृत्ती लागू करावी, सुंदर शाळा योजना स्वतंत्र बक्षीस वितरण करावे. क्रिडा विभागाकडून खेळाचे साहित्य मिळावे, इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील शिक्षक, शिक्षिकेंची मतदार म्हणून नोंदणी करावी. इतर शाळांप्रमाणे स्वयं अर्थसहाय्य शाळेलाही निधी मिळावा इ. विषयावर चर्चा करण्यात आली. यावेळी संघटनेचे अध्यक्ष प्राचार्य बिले यांनी वरीष्ठ पातळीवरून स्वयं अर्थसहाय्य इंग्रजी माध्यमाच्या शाळेंचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे सांगितले. या बैठकीला तालुक्यातील इंग्रजी माध्यम शाळा चालविणाऱ्या संस्थेचे अध्यक्ष व पदधिकारी उपस्थित होते.

# चिखलठाण ग्रामपंचायत तर्फे बायोगॅस सयंत्र वितरण



करमाळा(सं.प्र.) : बारामती इको सिस्टीम अंतर्गत बायोगॅस सयंत्र वितरण कार्यक्रम चिखलठाण ग्रामपंचायतीच्या वतीने संपन्न झाला. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष राजेंद्र बारकुंड, आदिनाथचे माजी संचालक केरू गव्हाणे, सरपंच धनश्री गलांडे, सोसायटीचे चेअरमन विकास गलांडे, दिनकर सरडे, रावसाहेब नेमाणे, विजयकुमार सुराणा, ईलाही इनामदार, मारूती गायकवाड, संतोष सरडे, श्रीपाल गव्हाणे, रोहित कोकाटे, नाना पवार, विठ्ठल गव्हो, दादा गव्हाणे, तानाजी नेमाणे, नागनाथ पाटील, फिरोज तांबोळी, सतीश बनसाडे यांचेसह शेटफळ येथील गजेंद्र पोळ, प्रशांत नाईकनवरे उपस्थित होते.

प्रियंका आय केअर हॉस्पीटल
पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा. मो.9423222266, 9604762600
उपलब्ध सुविधा... डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र
• मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
• जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
• फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
• सुसज्ज ऑपरेशन थिएटर • नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
• लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
• एस्कॅन बायोनेट्री आणि केरॉटोमेंट्री
डॉ.डी.बी.केमकर
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन
अत्याधुनिक प्रकाशची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)
सिध्दीविनायक ऑप्टीकल्स (आमच्याकडे शास्त्रोक्त पध्दतीने बनविलेले अचूक नंबरचे चष्मे अर्जंट बनवून मिळतील)
पत्ता : बँक ऑफ इंडिया समोर, करमाळा. मो.9527268181 / 9860872619

डिस्काउंटच्या जमान्यामध्ये भव्य डिस्काउंटसह
फ्रेश मटेरियलची हमी फक्त एव्हरफ्रेश सुपरमार्ट मध्येच !
थंडा.. थंडा.. कुल.. कुल..
Thanda Thanda Cool Cool
विविध प्रकारामध्ये 'फ्रेश व बेस्ट क्वॉलिटी'चे
उन्हाळी पदार्थ
गुलकंद । सब्जा बी । फुलराणी खडीसाखर । रोझवॉटर । गुलाब पाकळी । आईस्क्रीम पावडर
फालुदा । ताक मसाला । जलजिरा पावडर । लेमन गोळी । कोकम सरबत । कोकम आगळ
कैरी पन्हे । आवळा सरबत । रसना । ग्लुकोंडी । आमपन्ना पावडर । लिंबूपानी सरबत पावडर
कोकनट वॉटर पावडर । आवळा कॅन्डी । मधातील आवळा कॅन्डी । मोर आवळा । रूहाब्जा
मॅप्रो सरबत/क्रश सर्व फ्लेवर (रोझ, मँगो, पायनापल, ऑरेंज, स्ट्रॉबेरी, खस, कोकम)
लेमन गोळी व इतर फ्लेवर गोळ्या : लेमन गोळी । ऑरेंज संत्री गोळी । पेपर मिंट गोळी
पोलो गोळी । मँगो गोळी । कच्ची कैरी गोळी। पेरू गोळी । पान गोळी । काला खट्टा गोळी
चिंच गोळी । मिक्स फ्रूट गोळी । कोको बटर गोळी (जुनी रावळगाव गोळी)
नाचणीचे पदार्थ..
• नाचणी
• नाचणी पीठ
• नाचणीचे पापड
• नाचणी बॉबी
• नाचणी डिस्को पापड
• नाचणी बिस्किट

| वस्तू | एमआरपी | डि.ऑफर |
|---|---|---|
| मॅप्रो क्रश/सरबत | रू.१८० | रू.१४४ |
| टाटा गोल्ड चहा १ कि. | रू.४७५ | रू.३९९ |
| प्लास्टीक पाणी बॉटल (अनब्रेकेबल) | रू.११५ | रू.४९ |

सदर कात्रण घेऊन येणाऱ्या ग्राहकांसाठी ऑफर्स *
ऑफर कालावधी : १५ ते ३१ मार्च २०२४
पापड, सांडगे व लोणचेसाठी
• मुगदाळ • उडीददाळ • मटकीदाळ • पापड मसाला • पापड आटा • पापड खार • मोहरीदाळ
• लोणचे मसाला • मेथी • कारळं
सर्व ब्रॅन्डेड वस्तूंच्या छापील किंमतीवर कमीत कमी 10% डिस्काउंट
टीप : डिस्काउंट ऑफर, नियम व अटी समजावून घेण्यासाठी एव्हरफ्रेश सुपरमार्टला भेट द्या !
॥ नावाप्रमाणेच सर्व काही फ्रेश ॥
एव्हरफ्रेश सुपरमार्ट
॥ प्रिमियम क्वॉलिटी ॥ ॥ भरघोस डिस्काउंट ॥
*नियम व अटी लागू
किराणा । मसाले । प्रिमियम ड्रायफ्रुटस् । बिस्किटस् । नमकीन अँन्ड स्वीटस् । बेकरी अँन्ड मिल्क प्रॉडक्टस् ।
। नॅचरल प्रॉडक्टस् । पर्सनल, होम अँन्ड बेबी केअर । आयुर्वेदिक वस्तु । पुजेचे साहित्य
पंढरपूर अर्बन बँके समोर, दत्तपेठ, करमाळा. मो.7059293031

# सुनील सावंत यांनी तालुका राजकारणात यावे : अभयसिंह जगताप



करमाळा (सं.प्र.) : येथील सावंत गटाचे नेते व जिल्हा काँग्रेसचे सरचिटणीस सुनीलबापू सावंत यांनी तालुका राजकारणात उडी घ्यावी; असे आवाहन राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रमुख अभयसिंह जगताप यांनी केले.

श्री.सावंत यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने प्रमुख पाहुणे म्हणून श्री.जगताप बोलत होते. यावेळी व्यासपीठावर विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे, यशकल्याणीचे अध्यक्ष गणेश करे-पाटील, माजी नगरसेवक अल्ताफ तांबोळी, करमाळा अर्बन बँकेचे चेअरमन कन्हैयालाल देवी, पंचायत समितीचे माजी सदस्य ॲड.राहुल सावंत, युवा सेनेचे शंभुराजे फरतडे, माजी नगरसेवक संजय सावंत, शिवसेनेचे शहरप्रमुख संजय शिंदे, तालुकाप्रमुख देवानंद बागल, राष्ट्रवादीचे हनुमंत मांढरे-पाटील, माजी नगराध्यक्ष प्रशांत ढाळे, देवळालीचे सरपंच धनंजय शिंदे, विकास सोसायटीचे चेअरमन मनोज गोडसे, भाजपाचे शहराध्यक्ष जगदीश आगरवाल, बाजार समितीचे संचालक वालचंद रोडगे, शेतकरी संघटनेचे बाळासाहेब गायकवाड, सचिन गायकवाड, भरतशेठ दोशी आदी मान्यवर उपस्थित होते.पुढे बोलताना श्री.जगताप म्हणाले, की सावंत परिवाराचे काम हे सर्वसमावेशक असून सर्वसामान्यांसाठी ते कायम प्रयत्नवादी असतात. त्यांच्या माध्यमातून अनेक कामे केली जात आहेत. हीच कामे मोठ्या प्रमाणात करण्यासाठी सुनीलबापू यांनी तालुका कार्यक्षेत्र निवडून कार्यरत व्हावे. त्यांच्या प्रत्येक कार्यात आपण पाठीशी राहू; असेही आश्वासन श्री.जगताप यांनी दिले.मुख्य सत्कारानंतर अनेकांनी सुनीलबापू सावंत यांचा व्यक्तीश: सत्कार केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पैलवान गणेश सावंत, नागेश उबाळे, वाजीद शेख, मजहर नालबंद, आनंद रोडे, पप्पू कसाब, पांडूरंग सावंत, शुभम बनकर, बापू उबाळे, नागेश कसाब, राजेंद्र वीर, मार्तंड सुरवसे, धोंडिराम अडसुळ, औदुंबर बनकर, मंगेश शिरसाट, सुनील अंधारे, विकास पवार, अनिल यादव, साजिद बेग, फिरोज बेग, अरबाज बेग, खलील मुलाणी, सागर सामसे यांचे छ.शिवाजी तरूण मंडळाच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक निशांत खारगे यांनी केले तर आभार कु.जान्हवी सावंत हिने मानले.

> आमचे चुलते कै.सुभाषआण्णा सावंत यांनी सत्ता मिळो अथवा न मिळो, परंतु तत्व व चाकोरी सोडून वागायचे नाही. कितीही गरीब असलातरी त्यावर अन्याय झाल्यास त्याला न्याय मिळवून देण्यासाठी सर्व शक्तीने लढायचे; हे शिकवले आहे. तोच मार्ग आम्ही चालत आहोत. एखादी गोष्ट सत्य असेल आणि त्याला कितीही बलाढ्य माणसांनी विरोध केलातरी सुद्धा आपण त्या सत्य गोष्टीचा पाठपुरावा करतो व सत्यासाठीच संघर्ष करतो. हा संघर्ष यापुढेही चालवणार आहे. आजपर्यंत जे आपण सर्वांनी प्रेम केले तेच प्रेम यापुढेही द्या; असेही भावनिक आवाहन सुनील बापू सावंत यांनी केले.


३० वर्षापासून बांधकाम क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या..

**शहाणे कॉन्ट्रॅक्टर ॲन्ड सप्लायर्स**

करीता खालील पदावर नोकरभरती करणे आहे.
तरी इच्छुक उमेदवारांनी अपॉईंटमेंट घेऊन प्रत्यक्ष मुलाखतीस यावे..!

| | | |
|---|---|---|
| १ | साईट इंजिनियर | D.C.E किंवा B.E.civil |

संपर्क : ११३१, 'गोकुळ' निवास, खडकपुरागल्ली, करमाळा., जि.सोलापूर
मो.9423067038, 8379932662, 9370182018

**गाळे भाड्याने देणे आहे**

साईज : १४ x २८ (३९२ स्क्वे.फुट), १४ x ३४.६ (४८५ स्क्वे.फुट)
वैशिष्ट्ये : • रोडटच प्रशस्त हॉल • ऑफिस • क्लासेस व व्यवसायासाठी उपयुक्त सर्व सुविधा उपलब्ध.

संपर्क माढेश्वरी बँक जवळ, तेली गल्ली, करमाळा.
मो.9423526382, 9822861809



डॉ.राऊत Advanced dental Clinic & Root Canal Center

**दातांचा दवाखाना**

उपलब्ध सुविधा...
- इंटराओरल कॅमेराद्वारे तपासणी
- डिजीटल एक्स-रे
- अत्याधुनिक यंत्रणेद्वारे रूट कॅनल ट्रिटमेंट
- वेदनारहित दात व दाढ काढणे
- पडलेले दात बसविणे
- दात साफ करणे
- दाताच्या रंगाचे सिमेंट भरणे/चांदी भरणे





डॉ.कौस्तुभ काशिनाथ राऊत
बी.डी.एस.
(डेन्टल सर्जन)

उपलब्ध सुविधा...
- स्क्रुच्या सहाय्याने दात बसविणे (डेंटल इम्प्लांट)
- अक्कलदाढ काढणे
- वेडेवाकडे पुढे आलेले दात सरळ करणे
- अंशत: किंवा पूर्ण कवळी बसवणे
- हिरड्यांच्या रोगासाठी ट्रिटमेंट
- कॉस्मेटिक ट्रिटमेंट
- कर्करोगाचे निदान
- गरजेनुसार तज्ञ डॉक्टरांच्या भेटी

महात्मा गांधी शाळेच्या पाठीमागे, पुणे रोड, करमाळा. (मो.9552134186)


# पुरस्कारामुळे व्यक्तीची उंची वाढते : ज्येष्ठ पत्रकार राजा माने



करमाळा (सं.प्र.) : पुरस्कारामुळे व्यक्तीची उंची वाढते व व्यक्तीमुळे पुरस्काराचे मोल ठरते. अशा पध्दतीचा ग्रामसुधार समितीचा करमाळा भूषण पुरस्कार असून प्रतिवर्षी समाजात उच्च काम करणाऱ्या व्यक्तींचा गौरव या पुरस्काराने होत आहे. त्यामुळे या पुरस्काराचे आणि व्यक्तीचे दोघांचेही मोल वाढत आहे. असे मत राज्य डिजीटल मिडीया संघटनेचे अध्यक्ष व ज्येष्ठ पत्रकार राजा माने यांनी व्यक्त केले.

ग्रामसुधार समितीच्या वतीने देत असलेला करमाळा भूषण पुरस्कार यावर्षी आरोग्य अधिकारी व कवी डॉ.प्रदीप आवटे यांना देण्यात आला. त्यावेळी श्री.माने प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रामसुधार समितीचे अध्यक्ष ॲड.डॉ.बाबुराव हिरडे हे होते. व्यासपीठावर यशकल्याणीचे अध्यक्ष प्रा.गणेश करे-पाटील, सामाजिक कार्यकर्ते श्रेणिकशेठ खाटेर, उद्योजक डॉ.दिपक आबा देशमुख, वैद्यकिय शिक्षण आणि संशोधन संचालनालयाच्या अधिक्षक नम्रता रणसिंग, माधुरी आवटे, आदर्श युवा किर्तनकार लक्ष्मण महाराज झेंडे तसेच उदयसिंह मोरे-पाटील, राजेंद्र धांडे, सामाजिक कार्यकर्ते व्ही.आर.गायकवाड, ह.भ.प.मच्छिंद्र आप्पा अभंग, ॲड.अजित विघ्ने, वृक्षप्रेमी संदीप काळे, संस्थेचे उपाध्यक्ष नाथाजीराव शिंदे, बाजार समितीचे माजी सभापती प्रा.शिवाजी बंडगर, सचिव डी.जी. पाखरे, संयोजक राजेंद्र रणसिंग, एन.डी. सुरवसे, डि.के. पासंगराव, लालासाहेब रणसिंग, जालिंदर रणसिंग, शहीद नवनाथ गात समितीचे सचिव निळकंठ ताकमोगे, प्रा.संजय चौधरी, अर्जुन आबा तकीक, विठ्ठलराव शेळके, ज्येष्ठ कवी प्रकाश लावंड, प्राचार्य नागेश माने, केमिस्ट असोसिएशनचे सचिन साखरे, सोलापूर जिल्हा बँकेचे शाखाधिकारी आण्णा आवटे, उदयसिंह मोरे-पाटील, नागनाथ लकडे, किरण कवडे, ॲड.अशोक गिरंजे, ॲड.भागडे, पै.दत्तात्रय गायकवाड, सोमनाथ पाटील, बलभिम पोटे महाराज, गजेंद्र पोळ, प्रशांत नाईकनवरे, संजय हांडे, अनिल माने, संतोष माने व नागरीक उपस्थित होते.

पुढे बोलताना श्री.माने म्हणाले, की समाजामध्ये चांगलं काम करणाऱ्या माणसांना कधीच पुरस्काराची अपेक्षा नसते. पण अशा माणसांनाच पुरस्कार देऊन त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची गरज असते. तेच काम ग्रामसुधार समिती करत असून समाजासाठी सर्वस्व झोकून देऊन काम करणाऱ्या डॉ.आवटे यांना दिलेला करमाळा भूषण पुरस्कार म्हणजे नक्कीच पुरस्काराची उंची वाढवणारा पुरस्कार आहे.

प्रास्ताविक राजेंद्र रणसिंग यांनी केले तर आभार व्ही.आर.गायकवाड यांनी मानले. मानपत्राचे वाचन प्रा.शिवाजीराव बंडगर यांनी केले तर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सहशिक्षक रामहरी झांजुर्णे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विश्वास रणसिंग, प्रमोद रणसिंग, गणेश रणसिंग, भरत रणसिंग, आण्णा रणसिंग, बाबू रणसिंग, अशोक बोबडे, राजेंद्र क्षीरसागर, किसन काटे, संतोष झेंडे आदींनी परिश्रम घेतले.

# रावगाव येथे विविध विकासकामांचे भुमीपूजन व उद्घाटन

करमाळा(सं.प्र.) : रावगाव येथील बऱ्याच दिवसापासून असलेला पिण्याच्या पाण्याचा प्रश्न माजी आमदार जयवंतराव जगताप यांचे प्रयत्नाने करमाळा तालुक्यातून एकमेव रावगाव गावासाठी हरियाली योजना व जलस्वराज योजना राबवून सोडवलेला आहे. सध्या गाव जनजीवन योजनेत बसविलेले आहे. वीजेचा प्रश्न आमदार संजयमामा शिंदे यांच्या माध्यमातून कायमचा मिटविण्यात आला आहे. रावगाव येथे ३३/११ केव्ही सबस्टेशनचे भुमीपूजन व विविध विकासकामांचे भुमीपूजन उद्घाटन आमदार शिंदे यांचे हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अनिल पवार हे होते. यावेळी सतीश शेळके, अॅड.राहुल सावंत, विवेक येवले, बापूराव गायकवाड, शंकर जाधव, सुजित बागल, भोसेचे सरपंच भोजराज सुरवसे, राजेंद्र बाबर, दत्ता अडसुळ, लिलावती कांबळे, वीटचे सरपंच श्रीराम गणगे, भाऊसाहेब काळे, रघुनाथ काळे, माजी सरपंच आशिष गायकवाड, प्रताप झोळ, राष्ट्रवादी युवकचे जिल्हाध्यक्ष अभिषेक आव्हाड, अशपाक सय्यद, उदय ढेरे, बापू तांबे, विकास गोंदकर, कार्यक्रमाचे संयोजक व माजी सरपंच दादासाहेब जाधव, लिंबेवाडीचे सरपंच किरण फुंदे, वंजारवाडीचे सरपंच प्रविण बिनवडे उपस्थित होते.

# पायल अनिल रासकर हिची कृषी सेवकपदी निवड



करमाळा(सं.प्र.): कृषी विभागांतर्गत घेण्यात आलेल्या परीक्षेतून करमाळा येथील पायल अनिल रासकर हिची कृषी सेवकपदी निवड झाली आहे. पायल रासकर हिचे माध्यमिक शिक्षण कमलादेवी कन्या प्रशाला येथे झाले असून राजश्री छत्रपती शाहु महाराज कृषी विद्यालय कोल्हापूर येथे बीएस्सी अॅग्रीचे शिक्षण पूर्ण झाले आहे. पायल हिचे वडील करमाळा मार्केट यार्ड येथे तोलाईचे मुजरीचे काम करत असून त्यांची परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. त्यांच्या मुलीने अतिशय जिद्दीने व चिकाटीने यश संपादन केले आहे. पायल हिच्या निवडीबद्दल सर्व स्तरातून तिचे अभिनंदन केले जात आहे.


# खासदार रणजितसिंह नाईकनिंबाळकर यांच्या उमेदवारीचे शिवसेनेकडून स्वागत !

करमाळा(सं.प्र.) : खासदार रणजितसिंह नाईकनिंबाळकर यांना माढा मतदार संघातून मिळालेली उमेदवारी योग्य असून या उमेदवारीचे माढा लोकसभा शिवसेनेच्या वतीने स्वागत करीत असल्याची माहिती जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी दिली

माढा लोकसभा मतदारसंघात खा.नाईकनिंबाळकर यांनी सातत्याने गेली पाच वर्षापासून ठेवलेला जनसंपर्क, विकासकामा साठी दिलेले योगदान व सर्व शिवसैनिकांना दिलेले मानाचे स्थान यामुळे सर्व शिवसैनिक मनापासून काम करणार आहेत. किमान दीड लाख मताने रणजितसिंह नाईकनिंबाळकर विजयी होतील; असा विश्वास जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी व्यक्त केला.


तालुक्यातील महत्वाकांक्षी रिटेवाडी उपसासिंचन योजना मार्गी लावण्यासाठी खा.नाईकनिंबाळकर प्रयत्न करत आहेत. संवेदनशील मुख्यमंत्री यांनी याला मान्यता दिली आहे. याशिवाय करमाळा तालुक्यातील रेल्वेस्टेशनचा झालेला विकास, रेल्वेला ठिकठिकाणी मिळालेले थांबे. याशिवाय जातेगाव-टेंभूर्णी या मार्गासाठी ९३५ कोटी रुपयांचा केंद्राचा मिळालेला निधी यासह अनेक विकासकामे खा.नाईकनिंबाळकर यांच्यासाठी सकारात्मक बाबी आहेत. याशिवाय आदिनाथ सहकारी साखर कारखान्याला कर्ज पुनर्गठन करण्यासाठी शासकीय हमी देण्यासाठी खा.नाईकनिंबाळकर यांनी शब्द दिला आहे; असेही चिवटे यांनी सांगितले.

खुशखबर मुळव्याधवर ट्रीटमेंटसाठी नको नगर-बारामती-सोलापूर खुशखबर



बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ

डॉ.विकास देविदास नागरगोजे (एम.एस.मुंबई)



आता आपल्या करमाळ्यात !

उपलब्ध सुविधा...

- मुळव्याधवर इंजेक्शन
- डिलीव्हरीनंतर उद्भवारे कोंब
- एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्भवणारे कोंब
- संडासवाटे रक्त येणे, पु येणे
- संडासची जागा बाहेर पडणे
- संडास जागी खाज व आग होणे
- संडासाचा नागवेडा
- संडास नंतर बसण्यास त्रास होणे
- भगंदर, फिशर
- चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)

ओपीडी /ऑपरेशन ठिकाण

दर गुरूवार व सोमवार

वेळ : सकाळी ९.०० ते १२.००

लोकरे हॉस्पिटल

कृष्णाजीनगर, बायपास रोड करमाळा., जि.सोलापूर

(९८५०८५१००५)

परिचय

डॉ.विकास देविदास नागरगोजे

मुळव्याध तज्ञ

पदवी : नाशिक

पदवोत्तर : मुंबई



विशेष सुचना...

१. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रूग्णांची तपासणी करण्यात येईल.
२. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे.
३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील.
४. तपासणी अगोदर नावनोंदणी अनिवार्य.
५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.

नाव नोंदणीसाठी संपर्क

मो.9763035862

बार्शी धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल कोर्ट समोर, बार्शी.

# राणी शिंदे यांची जिल्हाधिकारी यांचेकडे तक्रार

# पोलीस पाटील भरतीमध्ये आर्थिक गैरव्यवहार व लेखी परीक्षेच्या गुणात फेरफार

करमाळा(सं.प्र.) : नुकत्याच झालेल्या पोलीस पाटील भरतीमध्ये आर्थिक गैरव्यवहार झाले असून लेखी परीक्षेतील गुणामध्ये फेरफार झाल्याची तक्रार शेलगाव(क) येथील राणी मधुकर शिंदे यांनी जिल्हाधिकारी यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे.

प्रसिध्दीस दिलेल्या निवेदनात सौ.शिंदे यांनी म्हटले आहे, की कुर्डुवाडी उपविभाग मध्ये झालेल्या गावकामगार पोलीस पाटील भरतीमध्ये मी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. सदर पदासाठी १७ डिसेंबर २०२३ रोजी लेखी परीक्षा घेण्यात आली होती. सदर परीक्षेमध्ये परीक्षार्थींना कार्बन कॉपी देणे गरजेचे होते तसेच गुण कळविणे आवश्यक होते. याबाबत तालुका स्तरावर तक्रारी आल्यानंतर मुलाखती पुढे ढकलण्यात आल्या. ९ मार्च २०२४ रोजी तोंडी परीक्षेचे पत्रक काढून ११ मार्च २०२४ रोजी तोंडी परीक्षा घेण्यात आली. सदर तोंडी परीक्षेत दहावी पास असणाऱ्या उमेदवारांना लेखी परीक्षेत जास्त गुण देऊन तोंडी परीक्षेत कमी गुण मिळाले असताना देखील त्यांची पोलीस पाटील या पदावर नेमणूक आर्थिक गैरव्यवहारातून करण्यात आली. तसेच ग्रॅज्युएट व पोस्ट ग्रॅज्युएट डीएड असणारे गुणवत्ताधारक उमेदवारांना लेखी परीक्षेत कमी गुण दाखवून फक्त दहावी उत्तीर्ण असणाऱ्या उमेदवारांची नेमणूक पोलीस पाटील पदावर केली गेली आहे. यावरून यामध्ये मोठा आर्थिक व्यवहार झाल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. तालुक्यातील १९ गावातील पोलीस पाटील भरती प्रक्रियेमध्ये उच्च शिक्षित उमेदवारांना डावलून दहावी पास असणारेच उमेदवार पात्र कसे झाले याची चौकशी करण्यात यावी तसेच शेलगाव (क) व तालुक्यातील उर्वरित गावातील पोलीस पाटील पदाची निवड चुकीची असून ती रद्द करून नव्याने पोलीस पाटील भरती प्रक्रिया राबविण्यात यावी; अशीही मागणी राणी शिंदे यांनी निवेदनाव्दारे केली आहे. याबाबत सौ.शिंदे यांनी मुख्यमंत्री, महसुल मंत्री, आयुक्त पुणे विभाग, उपविभागीय अधिकारी माढा विभाग, तहसीलदार करमाळा यांनाही लेखी निवेदन दिले आहे.

बंगला भाड्याने देणे आहे

पार्किंगची सोय असलेला दोन मजली बंगला (खाली 1BHK, वरती 1BHK) भाड्याने देणे आहे.

पत्ता : करमाळा स्मार्ट सिटी, हॉटेल राजयोगच्या बाजुला बायपास रोड, करमाळा.

संपर्क : मो.9960252244

श्री गजानन अगरबत्ती

- सुगंधी अगरबत्ती
- कापूर
- अत्तर
- धूप
- भीमसेन कापूर,
- विविध कलरची रांगोळी
- सर्व प्रकारचे लोबन,
- सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य योग्य दरात मिळेल !



पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर

(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)

आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर



रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.

- सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरूस्तीचे ठिकाण

कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.



मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)

दर महिन्याचा तिसरा रविवारी शिबीर वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत

Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते

श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.

प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२

लक्ष्मीकांत देवी (9421063525, 8805633525)

श्रीजी इस्टेट एजन्सी

पत्ता : मेनरोड, करमाळा.

- घरजागा, दुकान जागा
- प्लॉट व बंगले
- जमीन बिनशेती करणे
- व्यवहार करून दिले जातील
- सरकारी दस्तऐवजची कागदपत्र घरपोहोच केली जातील.









तोच विश्वास, तीच सेवा
प्रोप्रा : अमोल र. हिरण
मो.9270496867, 7057258385

**आनंद ड्रायफ्रुटस्**

Anand Dryfruit

• खास उन्हाळ्याकरीता...
थंडाई बोटल, ताक मसाला, कोकम सरबत, आवळा कँडी, वाळा सरबत, रसना, सब्जा बी, वाळा जुडी, रोझ सिरप, आईस्क्रिम पावडर, खडीसाखर, प्रवाळयुक्त गुलकंद, पापड आटा पापड मसाला, पापड खार, मोहरी डाळ,मेथी,लोणचे मसाले...

उत्कृष्ट कंपनीचे व क्वॉलिटीचे ड्रायफ्रुट

एकवेळ अवश्य भेट द्या..!

**करमाळा अर्बन बँकेशेजारी, मेनरोड, करमाळा.**

**एस.एम.के.एस. असोसिएटस्**

**अकौंट मॅनेजर पाहिजेत**

सीए फर्म मध्ये अकौटींगसाठी जागा भरणे आहे. (महिलांना प्रथम प्राधान्य)

**पदासाठी अटी खालीलप्रमाणे..**

- **कामाची वेळ :** सकाळी १० ते सायं ६.३० (महिलांसाठी वेळ त्यांच्या गरजेनूसार अॅडजेस्ट)
- **पात्रता :** कोणत्याही शाखेतील शिक्षण (मराठी, इंग्रजी नीट वाचता व लिहिता यावे) संगणक व्यवस्थित वापरता येणे आवश्यक.
- **पगार :** ६००० रू. किंवा त्यापेक्षा जास्त दिला जाईल.

संपर्क : सीए लहू काळे (मो.९७६२४४८२८२/९४२०४४८२८२/०२१८२-२२२१०३)

पत्ता : विद्यानगर, नवीन कोर्टासमोर, गाळा नं.१ व २, करमाळा.

टीप : येताना शैक्षणिक बायोडाटा घेवून येणे.


20 March
युवा नेते
पुणे जिल्हा उपाध्यक्ष, काँग्रेस(आय)
माजी नगरसेवक
राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे
करमाळा शहर अध्यक्ष
व युवा नेते
अमीर अल्ताफशेठ
तांबोळी
आपणांस वाढदिवसाच्या लाख.. लाख..
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
रूपचंद तालीम तरूण मंडळ मंगळवार पेठ, करमाळा.


त्वरा करा.., त्वरा करा..
3BHK रो-बंगलो
मोजकेच शिल्लक
वैशिष्ट्ये...
• शाळा, कॉलेज २०० मी. अंतरावर
• बांधकाम १४५० स्क्वे.फुट., जागा ९८० स्क्वे.फुट
• सर्व बांधकाम आरसीसी, कुंभारी वीट व ५३ ग्रेड सिमेंट
• ग्रेनाईट विंडोसील, अॅल्युमिनीयम कोटेड, स्लायडींग
• लाईट फिटींग, स्वतंत्र जीना, बोअर, पाण्याची टाकी
• प्रत्येकाला स्वतंत्र कंपाउंड वॉल, पार्किंग स्टाईलसह
बुकींगसाठी संपर्क
मो.9970795819
मो.7304050694
साईट पत्ता : बागवान नगर, पुणे रोड, करमाळा., जि.सोलापूर

# युवतीचे धाडसी पाऊल - ३२ महिलांना मिळवून दिला रोजगार

करमाळा(सं.प्र.) : 'कोशिश करनेवालोंकी कभी हार नही होती..' असे नेहमी म्हटले जाते. परंतु त्याची प्रचिती करमाळा येथील २८ वर्षाच्या कविता सुमित नाईक या युवतीच्या कार्यातून आली आहे.

कविता नाईक या करमाळा येथील सुमंतनगर भागात राहतात. त्यांचे आय.टी.आय. इलेक्ट्रीक असे शिक्षण झाले आहे. त्यांच्या आई रेखा परदेशी या सतत काही ना काही उद्योग करत असतात. त्यातूनच उद्योग करण्याची प्रेरणा सौ.कविता यांना मिळाली. त्यांचे पुणे येथील सुमित नाईक यांचेबरोबर ..... रोजी विवाह झाला आहे. सुरूवातीला त्या पुणे येथे गेल्यानंतर पतीच्या घरी गृहिणी म्हणून राहत होत्या. परंतु आईकडंचा असलेला वारसा मनात असल्याने त्यांनी आपल्या पतीला पुणे येथे व्यवसाय करण्यासाठी प्रवृत्त केले. सुरूवातीला त्यांनी लग्नातील रूखवतासाठी लागणाऱ्या वस्तु बनविण्यास सुरूवात केली. पुणे येथे महिला कामगार मिळत नव्हत्या. मिळाल्यातर त्यांचा रोजगार न परवडणारा होता आणि या व्यवसायाला जागाही मोठी लागत होती. त्यामुळे



सौ.कविता नाईक व त्यांचे पती सुमित नाईक यांनी करमाळा येथे व्यवसाय करण्याचे ठरविले. त्यानुसार सन २०१६ मध्ये हे दांम्पत्य करमाळा येथे आले. सुमंतनगर भागात त्यांनी जागा भाड्याने घेतली आणि व्यवसायाला सुरूवात केली. बटवा, टोपली, डोली, तुळस, तोरण, प्लॅस्टीक हार, गणपतीमकर, आकाशकंदिल आदी वस्तू आकर्षक स्वरूपात बनविण्यास सुरूवात केली. सुरूवातीला फक्त दोघे काम करत होते. या कामात यश मिळाल्यावर सुमित नाईक यांनी मार्केटींगची जबाबदारी स्वीकारली. तर कविता नाईक यांनी प्रॉडक्शनची जबाबदारी स्विकारली. महाराष्ट्रातील बहुतांशी मोठ्या शहरात व्यापाऱ्याकडे होलसेल मध्ये आपला माल ते विकतात. महाराष्ट्रातून त्यांच्या या वस्तुंसाठी मोठी मागणी आहे. सध्या त्यांचेकडे ३२ महिला काम करत आहेत. करमाळा सारख्या शहरात एका व्यवसायात एकाच ठिकाणी ३२ जणींना काम दिले जाते ही विशेष बाब आहे. प्रयत्न, चिकाटी व सातत्य असल्यावर जे यश मिळते ते कविताताईंना मिळाले आहे.



सुरूवातीला काम करताना खूप अडचणी आल्या. तयार केलेला माल विकताना व्यापाऱ्यांनी जवळपास आम्हाला निराश केले होते. परंतु माझे पती सुमित नाईक यांनी वेगवेगळ्या शहरातून वेगवेगळे व्यापारी शोधले व त्यामुळे आमचा मार्के टींगचा प्रश्न सुटला. ज्या व्यापाऱ्यांनी सुरूवातीला त्रास दिला पुढे तेच व्यापारी आगाऊ रक्कम देऊन योग्य भावात माल मागवू लागले आहेत. यापुढे आम्ही स्वत:च्या मशिनरी आणून किमान १२५ ते १५० महिलांना काम देण्याचे उद्दीष्ट आहे. सध्या माझ्याकडे ३२ महिला कायम काम करतात. अर्थातच हे काम उक्ते असून काही महिला स्वत:च्या घरी बसून काम करतात व केलेले काम आणून देऊन त्यांची मजुरी घेऊन जातात. आणखी जर कोणी गरजू महिला असतील तर आम्ही त्यांना काम देण्यास तयार आहोत. या व्यवसायात कष्ट व प्रामाणिकपणा महत्वाचा आहे.

**...सौ.कविता सुमित नाईक**
**(उद्योजिका) मो.८६२५८८४८८४**

# दही...

काय तुम्ही सुध्दा दही प्रेमी आहेत ? दही आणि दहीयुक्त पदार्थ अगदी चवीने आणि मनसोक्त खात आहात का ? तर मग दही विषयी पुढील माहिती तुम्हाला असायलाच हवी. आहारात अगदी आवडीने व चवीने समावेश असणाऱ्या दही या घटकाविषयी अगदी थोडक्यात जाणून घेऊनया..

**गुणधर्म...**

- आयुर्वेदानूसार दही हे मधूर रसात्मक, उष्ण वीर्यात्मक अम्लविपाकी असून म्हणजेच पचायला जड व स्निग्ध असते. तसेच दही रूचीकर व शरीरात स्निग्धता उत्पन्न करते.
- दही अग्नीप्रदीपक, शुक्रवर्धक, बल्पवर्धक, वातनाशक आहे.
- जुलाब, शीतज्वर, तोंडाला चव नसणे (अरूची), मूत्रजन्य विकार, कार्श्यता या व्याधींमध्ये दही सेवन उपयुक्त आहे.

**दही खाण्याचे नियम...**

- दही अर्धवट विरजलेले व आंबट झाले असता खाऊ नये. दही ताजे असतानाच खावे. शिळे, अति आंबट दही खाऊ नये.
- दहीवर अग्नीसंस्कार करून सेवन करू नये म्हणजेच दही गरम करून बनविलेले पदार्थांचे सेवन करू नये.
- शरद ग्रीष्म, वसंत ऋतुंमध्ये दही खाणे टाळावे
- अतिप्रमाणात व अवेळी दही खाऊ नये.
- रात्री दही अथवा दहीयुक्त पदार्थांचे सेवन पूर्णत: टाळावे. रात्रीचे दही खायचेच असेलतर साखर, आवळा चूर्ण, मध, मुगाचे सूप यासोबत खावे अन्यथा रात्रीचे दही पूर्णत: टाळावे.

**दह्याचे दुष्परिणाम...**

दही सेवन नियमांचे पालन न केल्याने तसेच नेहमी दही व दहीयुक्त पदार्थ खात असल्याने आपण अनेक व्याधींना आमंत्रण देत आहोत. जसे की सातत्याने दह्याचे सेवन केल्याने शरीरात रक्तस्त्राव होणे. ज्वर(ताप), त्वचा विकार, रक्ताचे प्रमाण कमी होणे (पांडू), रक्त दुषित होऊन रक्ताचे विकार, अम्लपित्त, विसर्प, कावीळ असे विकार निर्माण होतात. त्वचेचे विकार, रक्तस्त्राव, संधीवात आमवात, अम्लपित्त विसर्प असे व्याधी झाले असता दही खाऊ नये.

**वै.प्राजक्ता सोपान राख (एम.डी.आयुर्वेद)**
**यशस्व आयुर्वेद व पंचकर्म क्लिनिक**
**मो.७८७५३७७०००**

# 'कर्करोग' प्रतिबंध आणि लवकर निदान

**आरोग्य**

कर्करोग कसा येतो, कधी कधी गुपचूप.., फारसा त्रास न देता तर कधी खूप त्रास देत. शरीर काही सांगत असते, आपण शरीराची भाषा ऐकली पाहिजे.

१. खूप थकवा येतो. हा थकवा शोधला पाहिजे.
२. वजनात होणारी घट. काहीही प्रयत्न न करता आपोआप वजन घटत असेलतर ही शोध घेण्याची घंटा.
३. सतत येणारा ताप, वेदना
४. शौच आणि लघवी दररोज पहावी. लघवी लाल किंवा रक्त असलेली आणि जळजळ, उन्हाळी नसेलतर किंवा शौच काळसर असेलतर
५. अन्न गिळण्यास त्रास होत असेलतर
६. दीर्घकाळाचा खोकला, रक्त येत असेलतर
७. वारंवार तोंड येणे सोबत गुटखा तंबाखू असेल
८. वेगाने वाढत असलेली गाठ असेल स्तनात, स्तनातून लालसर स्त्राव, स्तनाचा आकार बदलला तर, शरीरात कोठेही वाढणारी गाठ.
९. रजोवृत्ती किंवा पाळी गेल्यानंतर होणारा रक्तस्त्राव किवा सतत होणारा रक्तस्त्राव अगदी थेंबा इतका असेल तरीही.
१०. दीर्घकाळ येणारा ताप. रात्री येणारा घाम.
११. दीर्घकाळ बसलेला घसा.
१२. बरी होत नसलेली जखम.
१३. एखादी चामखीळ किंवा तीळ अचानक मोठी झालीतर.. लक्ष देवून तातडीने तज्ञाकडून तपासणी महत्वाची आहे.

ही लक्षणे म्हणजे प्रत्येकवेळी कर्करोग असेलच असे नाही. अन्य काही आजारात ही लक्षणे आढळून येतात.

**...डॉ.सुभाष सुराणा, जेऊर**


# जमीन विकणे आहे


मांगी येथील गट नं.२६८/२/अ ही जमीन योग्य किंमत आल्यास त्वरीत विकणे आहे. शेतीमध्ये ६ बोअर घेतले असून ४ इंची पाणी लागले आहे. त्यासाठी कुसूम सौरऊर्जा योजनाकरीता अर्ज केलेला आहे. शेतीसाठी स्वतंत्र रस्त्याची सोय आहे. शेती मांगी गावापासून अवघ्या एक किमी अंतरावर आहे.

**संपर्क : मो.8648888567**

# JK Design Studio

**आर्किटेक्ट | इंजिनियर्स | इंटेरियर**

- आर्किटेक्चर ड्रॉईंग ॲन्ड डिझाईन (वास्तुशास्त्रनूसार)
- रेसिडेंशियल, कमर्शियल, इंडस्ट्रियल
- स्टील डिझाईन
- बिल्डिंग परवाना
- इंटेरियर डिझाईन
- बिल्डिंग कन्स्ट्रक्शन
- लॅन्डस्केप डिझाईन
- कन्सल्टन्सी




पत्ता २६९०/३३९ गणेशनगर, करमाळा.
jkdesignstudio23@gmail.com
Jk_design_studio23

Er.Irshad M. Kazi (B.E.Civil) Mo.8421124858
Ar.Junaid M. Kazi (B.Arch) Mo.9975579996


**सा.कमलाभवानी संदेश वार्षिक वर्गणी २०० रू**

# उमरड येथील सख्ख्या बहिणींची सरळसेवा भरतीतून निवड





करमाळा(सं.प्र.) : उमरड येथील एकाच कुटूंबातील दोन सख्ख्या बहिणींची राज्य सरकारच्या सरळसेवा भरतीतून निवड झाली आहे. अश्विनी रामहरी पाखरे (बागडे) यांची वनरक्षक म्हणून तर दैवशाला रामहरी पाखरे यांची पुणे ग्रामीण पोलीस मध्ये भरती झाली आहे. विशेष म्हणजे या दोन्ही बहिणींनी कोणताही खाजगी क्लास न लावता घरी बसून अभ्यास केला आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतूक होत आहे. अश्विनी रामहरी पाखरे (बागडे) हिने २०२३ मध्ये राज्य वनविभागात सरळसेवा भरतीतून परीक्षा दिली होती. त्यामध्ये तिला यश मिळाले असून तिची वनरक्षक म्हणून कोल्हापूर येथे निवड झाली आहे. ती स्वत: विवाहित असून तिला एक मुलगा आहे. तरीही घरी अभ्यास करून तिने हे यश संपादन केले आहे. तर दैवशाला पाखरे हिचे पदवीचे शिक्षण झाले असून तिनेही स्वकष्टावर प्रयत्न करून महाराष्ट्र पोलीस पदी निवड झाली आहे. दोघी बहिणींचे यशाबद्दल उमरड ग्रामपंचायतीने अभिनंदन केले आहे. विशेष म्हणजे रामहरी पाखरे हे शेतकरी कुटूंबातील असून त्यांना कष्ट करून मुलींना शिक्षण देवून स्वत:च्या पायावर उभे केले आहे. त्याबद्दल त्यांचेही विशेष कौतूक होत आहे.

# घारगाव ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी आशा देशमुखे बिनविरोध



करमाळा(सं.प्र.) : घारगाव ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी माजी आमदार नारायण पाटील गटाच्या आशा रामलिंग देशमुखे यांची तर उपसरपंच पदी दत्तात्रय सिताराम मस्तुद यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. या निवडीसाठी दोघांचे एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली. यावेळी पॅनलप्रमुख किरण पाटील तसेच जगताप-शिंदे गटाचे माजी उपसरपंच सतीश पवार, नारायण पाटील गटाचे सर्व सदस्य, माजी सरपंच लोचना पाटील, लक्ष्मी सरवदे अनिता भोसले, ग्रा.पं.सदस्य कविता होगले-पाटील आदी उपस्थित होते. निवडणूक निर्णय अधिकारी विनोद बनसोडे, तलाठी मयूर क्षीरसागर, सहायक सोमनाथ खराडे, ग्रामसेवक रविंद्र काळे यांनी निवडणुकीचे काम पाहिले.

## गुरूकुल पब्लिक स्कुल

श्रीदेवीचामाळ, ता.करमाळा, जि.सोलापूर

**शिक्षक पाहिजेत**

आमचे येथे सन २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षामध्ये खालील पदे भरणे आहेत.

| क्र. | विषयाचे नाव | पदांची संख्या | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | सहशिक्षक | B.A.D.ed, M.A.D.ed(किमान १ वर्ष अनुभव) | ५ |
| २ | विज्ञान व गणित | B.Sc.B.ed, M.Sc.B.ed(२ ते ५ वर्ष अनुभव) | ४ |
| ३ | चित्रकला | B.A., A.T.D. (किमान १ वर्ष अनुभव) | १ |
| ४ | मराठी, हिंदी | B.A.B.ed, M.A.B.ed(किमान २ वर्ष अनुभव) | २ |
| ५ | क्रिडा शिक्षक | B.P.ed (किमान २ वर्ष अनुभव) | २ |
| ६ | लिपीक | B.A., B.Sc (टायपिंग कॉम्प्युटर मराठी/इंग्रजी) | २ |
| ७ | ड्रायव्हर | १० वी, १२ वी, बी.ए.पास (किमान २ वर्ष अनुभव) | ३ |
| ८ | शिपाई | १० वी, १२ वी पास(पुरूष व महिला) | ३ |
| ९ | वॉचमन | १० वी पास | २ |

इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीसाठी शनिवार दि.३०/३/२०२४ रोजी सकाळी ९ ते १ या वेळेत अर्ज, मुळप्रमाणपत्र, झेरॉक्स प्रतिसह गुरूकुल पब्लिक स्कुल मध्ये वेळेवर उपस्थित रहावे.

मुख्याध्यापक
गुरूकुल पब्लिक स्कुल, श्रीदेवीचामाळ, ता.करमाळा.

डॉ.नायकुडे यांचे डोळ्यांचा दवाखाना **श्रीजय नेत्र रूग्णालय**

**डॉ.भाग्यश्री रामकृष्ण नायकुडे** (नेत्रतज्ञ व शल्य चिकित्सक)
B.A.M.S.,M.S.(Shalakya-Netra) (Gold Medalist) Reg no.1-77199-A

करमाळा शहरामध्ये मोतीबिंदू (Cataract), डोळ्यांवरील पडदा(Pterygium) तिरळेपणा (Squint) यासारख्या डोळ्यांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया अत्याधुनिक मशिनद्वारे(फेको लेझर) व तज्ञ डॉक्टरांच्या मार्फत केल्या जातील.

वेळ : सोमवार ते शनिवार स.१०.३० ते सायं ७ (रविवार बंद) इमर्जन्सी सेवा उपलब्ध

**श्रीजय ऑप्टिकल** (सर्व प्रकारचे चष्मे तयार करून मिळतील.)

श्री कमलादेवी रोड, कृष्णाजीनगर, करमाळा. मो.९८३४०७१२१८, ९९२१०१३४९३

# भाळवणी येथे २ लाख ४० हजार रू. किंमतीचे दारू रसायन व अन्य साहित्य जप्त

करमाळा (सं.प्र.) : भाळवणी येथे दारू रसायन व अन्य साहित्य २ लाख ४० हजार रू. किंमतीचे जप्त करण्यात आले आहे. या प्रकरणी पोलीसांनी चौघांवर कारवाई केली आहे.

यात पोलीस कॉन्स्टेबल सुनील गणेश जतकर यांनी फिर्याद दिली. त्यात त्यांनी म्हटले आहे, की भाळवणी येथे रेल्वे लाईन लगत काही लोकं हातभट्टी दारू करत असल्याची माहिती मिळाली असता, तेथे दत्तू सोपान काळे याच्याकडे एक लोखंडी बॅरल हातभट्टी दारू करण्याचे रसायन तसेच दोन निळ्या रंगाचे प्लॅस्टीकचे गुळमिश्रीत रसायन भरलेले बॅरल तसेच ५ लिटर हातभट्टी दारू असे एकूण ६०० लिटर रसायन ३१ हजार ५५० रूपयाचे तर त्यापुढे लक्ष्मी सोपान काळे हिचेकडे ३१ हजार ९०० रूपयाची ६०० लिटर गुळमिश्रीत रसायन व १० लिटर हातभट्टी दारू सापडली आहे. त्यानंतर मच्छिंद्र सोपान काळे याचेकडे ९३ हजार ४०० रूपयाची १८०० लिटर दारू रसायन सापडले आहे. तर राजेंद्र सोपान काळे याचेकडे ८३ हजार २०० रू. चे १६०० लिटर गुळमिश्रीत रसायन सापडले आहे. अशाप्रकारे १३ मार्चला दुपारी पावणेबाराच्या सुमारास या सर्वांकडे एकूण २ लाख ४० हजार रूपयाचे रसायन, चार लोखंडी बॅरल, १५ प्लॅस्टीकचे २०० लिटरचे बॅरल, ८ शंभर लिटरचे प्लॅस्टीकचे बॅरल असा माल सापडला आहे. अलिकडच्या काळातील पोलीसांनी ही मोठी कारवाई आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक कमलाकर पाटील, पोलीस उपनिरीक्षक बजरंग बाडीवाले, पोलीस उपनिरीक्षक राजेश जाधव, महंमद शेख, हवालदार प्रशांत सुरवसे, सर्व जिल्हा वाहतूक शाखा सोलापूर तसेच सोलापूर सहाय्यक पोलीस निरीक्षक टिळेकर, हवालदार बाळ सराफ, पोलीस नाईक पवार, चालक पोलीस कॉन्स्टेबल शिंदे अशा सर्वांच्या पथकाने केली आहे. पोलीसांच्या कारवाईबद्दल नागरीकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# निंभोरे येथील जावईने सासरवाडीचे धान्य पेटवले

करमाळा (सं.प्र.) : आपल्या पत्नीला नांदावयास का पाठवत नाही, या कारणावरून निंभोरे येथील जावई व त्याच्या नातेवाईकांनी सासरवाडीच्या घरातील अन्न-धान्य पेटवून दिले. हा प्रकार १२ मार्चला रात्री एकच्या सुमारास घडला आहे. या प्रकरणी सुमन मुकूंद भोसले रा.निंभोरे या महिलेने फिर्याद दिली आहे. त्यात तिने म्हटले आहे, की माझी मुलगी लक्ष्मी हिचे लग्न अकोणी, ता.कर्जत येथील बाक्या बंड्या काळे याच्याबरोबर झाले. परंतु गेल्या सहा वर्षापासून तिचे व नवऱ्याचे पटत नसल्याने ती माहेरी राहत आहे. याचा राग धरून १२ मार्च ला रात्री एक वाजता बाक्या बंड्या काळे तसेच लखन जिगर काळे रा.दहिगाव, गोट्या बंड्या काळे व नान्या बंड्या काळे दोघे रा.अकोणी, ता.कर्जत यांनी आमच्या घरासमोर ठेवलेले ज्वारी व गव्हाची पोती त्यावर रॉकेल टाकून पेटवून दिली आहे. या प्रकरणी पोलीसांनी चौघांविरूध्द गुन्हा दाखल केला असून पुढील तपास विनायक माहुरकर हे करत आहेत.

महाराष्ट्रात प्रथमच...



गाडी,युपीएस इन्व्हर्टरसाठी नविन बॅटरी घेताय?
बॅटरी बदलण्यापूर्वी तुमच्या जुन्या बॅटरीची तपासणी करा
आणि बॅटरी बदलण्याच्या त्रासापासून चिंतामूक्त व्हा...
आता जून्या बॅटरी चालतील नव्यासारख्या !

२ चाकी | ३ चाकी | ४ चाकी | ट्रक | ट्रॅक्टर | JCB | पोक्लेन | सोलर

एकाच छताखाली सर्व प्रकारच्या सोलर इन्व्हर्टर बॅटरी सर्व्हिसेस

**सुभद्रा पॉवर सोल्युशन्स**

प्रोप्रा. श्री. स्वप्निल आदिनाथ आदलिंगे (ME Industrial Automation) 9172927337
श्री.आदिनाथ जयवंत आदलिंगे (मा.विस्तार अधिकारी, पंचायत समिती, करमाळा) 7588506719

शाखा नं.१ त्रिमुर्ती कुशन्स् शेजारी पुणे रोड,करमाळा / शाखा नं.२: मातोश्री कॉम्प्लेक्स, IDBI बँकेच्या पाठीमागे, श्रीदेवीचामाळ रोड, भवानी नाका, करमाळा.

**पुनम एजन्सी**

अंबुजा सिमेंटचे करमाळा तालुका वितरक

• बिल्डींग मटेरियल सप्लायर्स • प्लंबींग • हार्डवेअर
स्टील, सिमेंट, फरशी, ग्रेनाईट
होलसेल व रिटेल योग्य दरात मिळेल

प्रोप्रा : प्रमोद शिंदे (9552946544) पत्ता: बायपास रोड, जेऊर.

# ग्राहक पंचायत व नगरपरिषद यांचे वतीने महिला दिन उत्साहात साजरा

करमाळा(सं.प्र.) : ग्राहक पंचायत व नगरपरिषद यांचे वतीने १२ मार्च ला महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचा प्रारंभ ग्राहक पंचायतचे बिंदू माधव जोशी व भालचंद्र पाठक यांच्या स्मृतीस अभिवादन करून मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पंचायत समितीच्या प्रशासन अधिकारी माधुरी सपाटे, तालुका वैद्यकिय अधिकारी डॉ.कोमल दुधे, लघुपाटबंधारे विभागाच्या अभियंता माधुरी दिवाण, ग्राहकपंचायतच्या जिल्हा महिला आघाडी प्रमुख माधुरी परदेशी आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता सुनिता पाटील या होत्या. यावेळी सुनिता पाटील, ॲड.शशिकांत नरूटे, भिष्माचार्य चांदणे यांची भाषणे झाली तर माधुरी परदेशी यांनी प्रास्ताविक केले. यावेळी सखी मेळा या सांस्कृतिक कार्यक्रमात ग्राहक गीत, योगगीत, प्रात्यक्षिक गीता प्रार्थना, एकपात्री नाटक, मुक अभिनय, राष्ट्रभक्तीपर गीते, सोलो डान्स, ग्रुप डान्स, तलवार डान्स आदी एकाचढ एक सादरीकरण करण्यात आले. या कार्यक्रमासाठी चक्रधर पाटील, निलेश कुलकर्णी, गणेश शिंदे, संभाजी कोळेकर, अशपाक सय्यद, विजय देशपांडे, निलीमा पुंडे, मंजिरी जोशी, ललिता वांगडे, रेखा परदेशी, सारीका पुराणिक, निशीगंधा शेंडे, सुलभा पाटील यांनी परिश्रम घेतले. सुत्रसंचालन स्वाती माने यांनी केले.


एज्युकेशन रिसर्च अकॅडमी संचलित

**न्यु. इरा पब्लिक स्कुल, जेऊर ता.करमाळा.**

**शिक्षक पाहिजेत**

| क्र. | पदाचे नांव | शैक्षणिक पात्रता | पुरूष/महिला | पदसंख्या |
|---|---|---|---|---|
| १ | सहशिक्षक | H.Sc D.T.Ed / D.Ed | महिला | २ |
| २ | क्लार्क | H.Sc, MS-CIT | महिला | १ |

वरील शैक्षणिक पात्रता असलेल्या इच्छुक व अनुभवी उमेदवारांनी मुलाखतीस मुळ प्रमाणपत्रे व छायांकित प्रतीसह दि.२० ते ३१ मार्च या दरम्यान सकाळी ९ ते १२ या वेळेत खालील पत्त्यावर उपस्थित रहावे..!

पत्ता : न्यु इरा पब्लिक स्कुल, दहिगांव रोड, जेऊर, ता.करमाळा.

संपर्क : मो.8698802828, 7744042294, 9850780789


# मुख्याधिकारी यांच्या लेखी आश्वासनानंतर जमादार यांचे उपोषण मागे

करमाळा(सं.प्र.): करमाळा नगरपालिकेच्या ठेकेदारावर योग्य ती दंडात्मक कारवाई करण्यात यावी; या मागणीसाठी करमाळा अर्बन बँकेचे माजी उपाध्यक्ष फारूक जमादार यांनी सुरू केलेले उपोषण मुख्याधिकारी यांच्या लेखी आश्वासनानंतर मागे घेतले आहे. स ं ज य कुंभार ते कत्तलखाना रस्ता डांबरीकरण करणे तसेच चिंचकर घर ते स्वामी समर्थ मंदिर रस्ता डांबरीकरण करणे, मडके घर ते स्वामी समर्थ गटार बांधकाम करणे ही कामे गेली दोन ते तीन वर्षापासून ठेकेदारांना कामाची वर्कऑर्डर देऊनही ठेकेदार काम करत नव्हते. त्यामुळे फारूक जमादार हे न.पा.च्या कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसले होते. मुख्याधिकारी लक्ष्मण राठोड यांचे वतीने अभियंता आकाश वाघमारे, कार्यालयीन अधिक्षक बदे यांनी लेखी आश्वासन देऊन आपण मागणी केलेले सदरचे काम दोन दिवसापूर्वी चालू केलेले आहे आणि नगरपालिका ठेकेदारांवर योग्य ती कारवाई करेल; असे लेखी आश्वासन दिल्यानंतर जमादार यांनी उपोषण सोडले. या उपोषणास भाजपाचे गणेश चिवटे, काँग्रेसचे सुनील सावंत, राष्ट्रवादीचे हनुमंत मांढरे-पाटील, माजी नगरसेवक संजय सावंत, शिवसेनेचे संजय शिंदे, मनसेचे संजय घोलप, दलित सेनेचे लक्ष्मणराव भोसले यांचेसह शहरातील विविध संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी पाठींबा दिला होता.

# महिला दिनानिमित्त वांगी नं.२ येथे कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

करमाळा(सं.प्र.): लोकमंगल नागरी पतसंस्थेच्या वतीने महिला दिनानिमित्त कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला. वांगी नं.२ येथील प्राथमिक शाळेत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेऊर येथील भारत महाविद्यालयाच्या प्रा.सुनिता कांबळे या होत्या. जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरूवात झाली. शाखा व्यवस्थापक संदिप शिंदे यांनी प्रास्ताविक करून पतसंस्थेच्या विविध योजनांची माहिती दिली. यावेळी कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल शेटफळ येथील महिला शेतकरी हर्षाली नाईकनवरे यांचा तर शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल वैष्णवी बेंद्रे, स्पर्धा परीक्षेत यश मिळवून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या उपसंचालक पदी निवड झाल्याबद्दल सुप्रिया रोकडे, शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल विमल कळसाईत, राजकीय क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल सुवर्णा कांबळे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी भाग्यश्री रोकडे, कळसाईत ताई, बेंद्रे मॅडम, खानट, ढवळे यांचेसह बचत गटाच्या अध्यक्षा, अंगणवाडी व आशाताई यांचेबरोबरच गावातील महिला उपस्थित होत्या.


महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त स्वयं अर्थसहाय्यित शाळा

श्री बालाजी बहुउद्देशीय संस्था, चिखलठाण संचलित

**न्यू. इरा पब्लिक स्कुल ॲन्ड ज्युनिअर कॉलेज, चिखलठाण**

ता.करमाळा, जि.सोलापूर

**शिक्षक पाहिजेत**

करमाळा तालुक्यातील ग्रामीण भागात गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी नांवलौकीक मिळवलेल्या संस्थेत शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ साठी इंग्रजी, सेमी इंग्रजी माध्यमाच्या व ज्युनिअर कॉलेज मध्ये खालील पदे त्वरीत भरणे आहेत.

| क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक पात्रता | विषय | पदसंख्या |
|---|---|---|---|---|
| १ | सहशिक्षक | H.S.C. D.T.Ed | सर्व विषय (इंग्रजी माध्यम) | ३ |
| २ | सहशिक्षक | H.S.C. D.T.Ed | सर्व विषय (मराठी माध्यम) | ३ |
| ३ | सहशिक्षक | B.A./M.A. B.Ed | इंग्रजी | १ |
| ४ | सहशिक्षक | B.A./M.A. B.Ed | हिंदी | १ |
| ५ | सहशिक्षक | B.Sc/M.Sc B.Ed | Chemistry | १ |
| ६ | सहशिक्षक | M.Sc.B.Ed | Physics | १ |
| ७ | सहशिक्षक | M.Sc.B.Ed | Maths | १ |
| ८ | सहशिक्षक | M.Sc.B.Ed | Biology | १ |
| ९ | स्पर्धा परीक्षा तज्ञ (नवोदय/स्कॉलरशीप) | B.A./B.Sc/B.Com | सर्व विषय | १ |
| १० | क्लार्क (महिला) | B.A./B.Com/B.Sc (Typing Tally) | --- | १ |
| ११ | क्रिडा शिक्षक | B.P.Ed | --- | १ |

- पात्र उमेदवारांनी सोमवार दि.१/४/२०२४ रोजी प्रशालेच्या कार्यालयात अर्ज व आवश्यक कागदपत्रासह स्वखर्चाने सकाळी १० ते १ या वेळेत वरील पत्त्यावर उपस्थित रहावे.
- टीप : अनुभवी उमेदवारास प्राधान्य राहील.

संपर्क : मो.९८५०७८०७८९, ९७६३६४४४०३, ७७४४०४२२९४


**ॲड.प्रियाल ल. अग्रवाल**
ऑफिस नं.१०, दिवाणी न्यायालय समोर
विद्यानगर, करमाळा., जि.सोलापूर
मो.९७६६३३६६७७

# सावधानतेची नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, मौजे जेऊर, ता.करमाळा, जि.सोलापूर येथील क.गट नं.२२७/१ पैकी, क्षेत्र - ०० हे. ९४ आर, आकार - ०० रू. १५ पैसे तसेच डि.सोलापूर, ता.करमाळा पैकी मौजे जेऊरवाडी हद्दीतील शेतजमीन मिळकत क.ग.नं.१५०/२ पैकी क्षेत्र - ०१ हे. ७५ आर, आकार - ०२ रू. ८४ पैसे. या मिळकती मध्ये आमचे अशिल नामे सौ.नंदा सुरेश लोंढे यांचा हक्क, अधिकार व हितसंबंध असून तसा आमचे अशिलांचा सदर मिळकतीबाबत करार देखील झालेला होता व आहे. सदर मिळकतीबाबत तिऱ्हाईत इसमांनी हेतुपुरस्कर हस्तांतरीत व्यवहार करून पुढे त्या अकृषिक करून त्याचे प्लॉट्स तयार करून ते विक्री करण्याचे प्रयत्नात असलेबाबत आमचे अशिलांना खात्रीलायक माहिती असल्याने आमचे अशिलांनी सदर मिळकतीबाबत मे.करमाळा येथील सि.ज.सि.डि.सो यांचे कोर्टात स्पे.मु.नं.८७०/२०२३ अन्वये साठेखतावरून ताब्यासह खरेदीखत करून मिळणेसाठी आणि जाहीर ठरावासाठी दावा दाखल केलेला असून तो अद्यापपावेतो प्रलंबित आहे. अशा परिस्थितीमध्ये सदर मिळकतीमध्ये वर नमूद दाव्यातील प्रतिवादींनी मिळकत ही अकृषिक करून तिचे प्लॉटींग पाडून विक्री केलेस सदर मिळकतीमधील प्लॉट्स विकत घेणारे लोकांना देखील कायदेशीर बाबींना सामोरे जावे लागेल. तसेच यदाकदाचित आमचे अशिलांना दाव्यामध्ये यश आलेस प्लॉट्स खरेदीधारकांना त्यांचा मालकी हक्क जाणार आहे व इतर स्वरूपाचे नुकसान होणार आहे. सबब गाव मौजे जेऊर व आजुबाजूचे परिसरातील लोकांची फसगत होऊ नये, सबब सदरच्या नोटीसीने तमाम लोकांस सावध करणेकरीता प्रस्तुतची सावधानतेची जाहीर नोटीस आमचे अशिलांना देणे भाग पडत आहे. सदरची नोटीस जाहीर होऊन देखील कोणी वर नमूद मिळकतीमध्ये कुठल्याही प्रकारचा व्यवहार केलेस तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही सावधानतेची जाहीर नोटीस दिली. ता.२८/०२/२०२४

**अशिला तर्फे ॲडव्होकेट**

## शिवसेना वैद्यकिय मदत कक्षाच्या
# सोलापूर जिल्हा माढा विभाग समन्वयक पदी स्नेहल कटारिया



करमाळा(सं.प्र.) : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली व सूचनेनुसार वंदनीय बाळासाहेब ठाकरे शिवसेना वैद्यकिय मदत कक्षाच्या सोलापूर जिल्हा माढा विभाग समन्वयक पदी करमाळा येथील व्यापारी स्नेहल दिपक कटारिया यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीचे पत्र आमदार शहाजीबापू पाटील (सांगोला) व शिवसेना वैद्यकिय मदतक कक्षप्रमुख मंगेश चिवटे यांचे हस्ते कटारिया यांना देण्यात आले. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख महेश चिवटे, शहरप्रमुख नागेश काळे यांचेसह सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

निवडीनंतर बोलताना स्नेहल कटारिया म्हणाले, की आपल्यावर जी जबाबदारी दिलेली आहे ती मी पूर्ण अंत:करणाने पार पाडेल व जे गरजू आहेत त्या सर्वांना वैद्यकिय मदत कक्षाकडून जास्तीत जास्त मदत मिळवून देण्याचा प्रयत्न करेल. तरी गरजवंतांनी वैद्यकीय मदत कक्षाकडून कधीही गरज पडल्यास माझ्याशी संपर्क साधावा; असे आवाहन कटारिया यांनी केले. आपण सर्व गरजूंसाठी चोवीस तास सेवेसाठी तत्पर असून वैद्यकिय मदत कक्षासाठी मो.९४२२७१०००१, ९४२२७१०००२ या क्रमांकावर संपर्क साधावा; असेही कटारिया यांनी सांगितले.

श्री बालाजी उद्योग संचलित

## विश्वा ॲक्वा पॅकेजड् ड्रिंकींग वॉटर

करमाळा, जि.सोलापूर

**पदभरती चालू आहे**

आमच्या येथे खालील पदांसाठी कामगार पाहिजेत

| पदाचे नाव | शैक्षणिक पात्रता | पदसंख्या |
|---|---|---|
| १) मायक्रो बायोलॉजीस्ट | बी.एस्सी, मायक्रो बायोलॉजी डिग्री | १ |
| २) केमिस्ट | बी.एस्सी, केमिस्ट डिग्री | १ |
| ३) फिलींग | अनुभवी ऑपरेटर | १ |
| ४) लेबलींग | अनुभवी ऑपरेटर | १ |
| ५) ब्लोईंग | अनुभवी ऑपरेटर | १ |
| ६) स्टोअर किपर | --- | १ |
| ७) अकौटंट | टॅलीचे ज्ञान आवश्यक | १ |
| ८) ड्रायव्हर | कमर्शियल ड्रायव्हींग लायसन्स आवश्यक | २ |
| ९) कामगार | --- | ३ |

तरी इच्छुक उमेदवारांनी आपल्या संपूर्ण माहितीसह व कागदपत्रांसह समक्ष खालील पत्त्यावर येवून भेटावे !

**संपर्क : मो.7841868462, 9730961402**

**पत्ता : श्री कमलादेवी औद्योगिक वसाहत, करमाळा., जि.सोलापूर**

## मोहल्ला गल्ली येथील महंमद मुआज याचा पहिला रोजा

करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहरातील मोहल्ला गल्ली येथील समीर शेख यांचे चिरंजीव महंमद मुआज (वय-५ वर्षे) याने रमजान महिन्याच्या पहिल्या दिवशी पहिला रोजा केला. सायंकाळी ६.४१ मिनिटांनी माँ आयेशा मस्जिद मध्ये रोजा ईसार करण्यात आला. या लहान बालकांनी पहिला रोजा केल्याने करमाळा तालुक्यातील सर्व मुस्लिम समाजात मुआज याचे कौतूक होत आहे.

## जाहीर खुलासा नोटीस

तमाम लोकांना या जाहीर खुलासा नोटीसीने कळविण्यात येते की.. दावा मिळकतीचे वर्णन :
अ) डी.सोलापूर सब डि. करमाळा पैकी करमाळा नगरपरिषद हद्दीतील बिनशेती जमीन गट नं.१८९, क्षेत्रफळ ०३ हे. ८३ आर. या जमिनीमध्ये ले आऊट नकाशाद्वारे एकूण १२० बिनशेती प्लॉटस्. ब) डि.सोलापूर सब डि करमाळा पैकी करमाळा नगरपरिषद हद्दीतील करमाळा येथील घरजागा मिळकती..
क) डि.अहमदनगर पैकी नागापूर संभाजीनगर भागातील महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ मधील प्लॉट नं.आरएम २४ यासी क्षेत्रफळ-५४० चौ.मी. यापैकी १०८ चौ.मी. क्षेत्राची प्लॉट जागा यामध्ये तळमजल्यावर एक किचन, एक हॉल, एक बेडरूम व संडास बाथरूम. तसेच पहिल्या मजल्यावर एक हॉल व संडास बाथरूम.

| अ. क्र. | सि. स.न. | क्षेत्रफळ चौ.मी. | अ. क्र. | सि. स.न. | क्षेत्रफळ चौ.मी. |
|---|---|---|---|---|---|
| १ | १२२३ | ५१४.६ | ६ | १२२८ | ३०.४ |
| २ | १२२४ | ८५.३ | ७ | १२२९ | ३६.० |
| ३ | १२२५ | ९२.८ | ८ | १२३० | ९.६ |
| ४ | १२२६ | १२.९ | ९ | १२३२ | १३.४ |
| ५ | १२२७ | १४.३ | -- | --- | --- |

ड) टोयाटो किर्लोस्कर मोटार प्रा.लि.या कंपनीची टोयाटो एनेव्हा क्रिस्टर डिझेल कार (व्हाईट पर्ल) याचा रजि नं.एमएच-१६, सी क्यु - ०२१४,
येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत.

वर नमूद मिळकतीबाबत सौ.किर्ती विश्वास बोराडे (वादी) व विशाल शंकर त्रिंबके वगैरे ५ (प्रतिवादी) यांचेत वाटपाचा दावा स्पेशल दिवाणी मुकदमा नं.५०१/२०२३ हा मा.दिवाणी न्यायालय, करमाळा यांचे कोर्टात दि.३.३.२०२४ रोजीचे लोकअदालतीमध्ये तडजोड झालेला असल्याने सदरच्या दाव्यातील वाद विषय मिटलेला आहे. दावा तडजोड झाल्याने दाव्यातील स्टे ऑर्डर रद्द झालेली आहे. सबब वर नमूद मिळकती मधील अ मधील बिनशेती प्लॉटस् विक्री करणेस वादी सौ.किर्ती विश्वास बोराडे यांची काहीही हरकत नाही.

सबब ही जाहीर खुलासा नोटीस दिली.
ता.१५/३/२०२४

**ॲड.विक्रमसिंह सुरेश काटुळे**
**अशिला तर्फे ॲडव्होकेट**

**श्री.डॉ.बाबूराव तुकाराम हिरडे**
एम.ए.पीएच.डी.एलएल.बी.एम.सी.जे
ॲडव्होकेट
वेताळपेठ, करमाळा, जि.सोलापूर

## जाहीर नोटीस

तमाम करमाळा तालुक्यातील नागरिकांना विशेषत: सालसे परिसरातील नागरिकांना या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते, की खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकती, या नानासाहेब उत्तमराव पाटील रा.सालसे, ता.करमाळा, जि.सोलापूर यांच्या नावावर आहेत. वास्तविक पाहता सदरच्या मिळकती या आमचे अशिल व त्यांचे आई व बहिण यांचे समाईक मालकीची व समाईक कबजेवहीवाटीची आहे. सदर मिळकतीचे अद्याप सरस निरस मानाने वाटप झालेले नाही. परंतू नानासाहेब उत्तमराव पाटील यांनी त्यांचे व आमचे अशिलाचे वडील उत्तम रामचंद्र पाटील यांच्यावर प्रभाव टाकून व त्यांचे वयोवृध्दपणाचा गैरफायदा घेऊन बेकायदेशीररित्या समाईकातील मिळकतीचे दि.१२/६/२०२० रोजी स्वत:च्या नावे बक्षीसपत्र करून घेऊन परस्पर स्वत:च्या नावाची नोंद लावून घेतली आहे. वास्तविक पाहता उत्तम रामचंद्र पाटील यांना संपूर्ण मिळकतीचे कायद्याने बक्षीसपत्र करून देण्याचा कोणताही हक्क अधिकार नव्हता. तसेच नानासाहेब पाटील यांनाही अशा पध्दतीने बेकायदेशीर बक्षीसपत्र करून घेण्याचा कोणताही हक्क हितसंबंध नव्हता. सदरची मिळकत एकत्र कुटूंबाची व समाईक वहिवाटीची आहे हे माहित असूनही नानासाहेब उत्तमराव पाटील यांनी दस्त क्र.१५७२ व दस्त क्र.१५७३, ता.१२/६/२०२० रोजी करून घेतलेली बक्षीसपत्र हे पूर्णत: बेकायदेशीर आहे. याबाबत आमचे अशिल दिवाणी न्यायालयात लवकरच वाटपाचा दावा दाखल करणार आहेत. असे असताना बेकायदेशीर बक्षीसपत्राच्या आधारावर लागलेल्या पोकळ नोंदीच्या आधारे नानासाहेब उत्तमराव पाटील हे सदरच्या मिळकती विक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यामुळे सदरची जाहीर नोटीस देणे क्रमप्राप्त झाले आहे. तरी खाली परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही श्री.नानासाहेब उत्तमराव पाटील यांच्याकडून कोणीही खरेदी करून घेऊ नये. त्यांना स्वतंत्ररित्या मिळकत विक्री करण्याचा कोणताही कायदेशीर आधिकार नाही. जर तशी कोणी सदरची मिळकत त्यांच्याकडून खरेदी केलीतर खरेदीदारास सदर मिळकतीचा कब्जा मिळणार नाही. कोणाचीही फसवणूक होवू नये म्हणून सदरची जाहीर नोटीस दिली.

परिशिष्ट : डी. सोलापूर सब डी व ता. करमाळा,पंचायत समिती, करमाळा मौजे सालसे येथील ग्रामपंचायत सालसे हद्दीतील जमीन गट नंबर ४० पैकी, क्षेत्र - ०१ हे.४९ आर व पो.ख. - ०० हे. ०८ आर. एकूण - ०१ हे. ५७ आर, आकार - ०१ रू.४५ पैसे व गट नं.४१३, क्षेत्र - ०० हे. ४१ आर, पो.ख.- ०० हे. ११ आर, एकूण - ०० हे. ५२ आर, आकार - ०० रू. ९५ पैसे ही मिळकत आहे. संपुर्ण मिळकत असल्यामुळे त्याची चतु:सीमा दिलेली नाही.येणे प्रमाणे वर्णनाची मिळकत त्यातील वृक्षपाषाण वैगरे तद्‌ंगभुत वस्तुसह.
ही जाहीर नोटीस दिली ता. ११/०३/२०२४


**श्री.कल्याण उत्तमराव पाटील**
**अशिला तर्फे ॲडव्होकेट**

डिजीटल युगात ताठ मानेनं जगायला शिकवणारा

**शासनमान्य कोर्स**



# MS-CIT



**प्रवेश देणे सुरू**

परीक्षा मे २०२४

MS Office 2019, Windows 10
Internet, Online Working
मर्यादित प्रवेश, त्वरीत प्रवेश घ्या !

प्रवेश मुदत दि.२५ मार्च

**ई टेंडर निविदा** **नगरपालिका, जिल्हापरिषद, ग्रामपंचायत**
सर्व प्रकारचे शासकीय निविदा भरण्याची सुविधा

संपर्क **वर्ल्ड कॉम्प्युटर सेंटर,** अभंग हॉस्पिटल जवळ, शिवाजीनगर, वाय.सी.एम.कॉलेज रोड, करमाळा. मो.9423526382


आमचे मित्र
मा.श्री. अभिषेक देवी
आपणांस वाढदिवसाच्या
17 March
हार्दिक शुभेच्छा...
शुभेच्छुक
श्री संत गजानन महाराज मोबाईल अँन्ड इलेक्ट्रीक
मेनरोड, करमाळा. (मो.9420920007, 885854009)


शिवसेना वैद्यकिय मदत कक्षाच्या
सोलापूर जिल्हा माढा विभाग समन्वयकपदी
करमाळा येथील प्रसिध्द व्यापारी
मा.श्री.स्नेहल दिपक कटारिया यांची
निवड झाल्याबद्दल...
हार्दिक अभिनंदन !
शुभेच्छुक
व्यापारी मित्र परिवार, शितलकुमार गांधी, अपूर्व कोठडिया, सोपान मस्कर करमाळा